आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१२ डिसेंबर २०२४ -गुरुवार

**ठळक बातम्या**

- विरोधकांचा स्थगन प्रस्ताव फेटाळल्यामुळे गदारोळ, राज्यसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब
- रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी कॅशलेस उपचार योजना लवकरच देशभरात लागू करण्याची नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात भारताच्या बँकिंग क्षेत्रात आमुलाग्र बदल झाल्याचं निर्मला सीतारामन यांचं प्रतिपादन
- गहूसाठ्याच्या मर्यादेत बदल करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

  **आणि**
- गाझा पट्टीत युद्धबंदी करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांचा ठराव मंजूर

**<><><><><>**

राज्यसभेत विरोधी पक्षाने दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्याला सत्ताधारी भाजपा खासदारांनी दिलेल्या प्रत्युत्तरानंतर राज्यसभेत एकच गोंधळ झाला. या गोंधळातच अध्यक्षांनी राज्यसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केलं. त्या आधी भाजपा खासदार जे.पी. नड्डा यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर टीका केली.

ते म्हणाले की, स्थगन प्रस्ताव स्वीकारण्याच्या संदर्भात अध्यक्षांना प्रश्न विचारता येत नाही. मल्लिकार्जुन खरगे सदनाच्या मर्यादेचं उल्लंघन करत असून काँग्रेस राज्यसभा अध्यक्षांच्या पदाचा अपमान करत आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अदानी लाचखोरी प्रकरणी संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीच्या मागणीसाठी आज संसद परिसरात विरोधी पक्षानं आंदोलन केलं. या आंदोलनात काँग्रेस, मार्क्सवादी आणि इतर विरोधी पक्षाचे खासदार सहभागी झाले होते.

**<><><><><>**

रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी कॅशलेस उपचार योजना लवकरच देशभरात सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या योजनेमुळे रस्ते अपघातातल्या जखमींना रुग्णालयात दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार कॅशलेस पद्धतीने मिळू शकतील, असं गडकरी यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट गडकरी**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताच्या बँकिंग क्षेत्रात विशेषतः सार्वजनिक बँकांमध्ये आमूलाग्र बदल झाले, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा पैसा भ्रष्टाचारासाठी वापरला जात असल्याचा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचा आरोप तथ्यहीन असल्याचं सीतारामन यांनी स्पष्ट केलं आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा विशिष्ट उद्योगपतींसाठी एटीएम म्हणून वापर केला जात असे, अशीही टीका सीतारामन यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात केली आहे. मोदी सरकारच्या काळात ५४ कोटी जनधन खाती उघडण्यात आली आहेत आणि विविध योजनांच्या अंतर्गत ५२ कोटी तारणविरहित कर्जप्रकरणं मंजूर झाल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्र मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाह्यान आज नवी दिल्लीत चौथ्या भारत-संयुक्त अरब

अमिरात धोरणात्मक संवाद परिषदेत सहभागी होणार आहेत. नाह्यान आज दुपारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचीही भेट घेणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी संयुक्त अरब अमिरातीच्या नेत्यांचं समाजमाध्यमांवरून स्वागत केलं आहे.

या भेटीमुळे उभय देशांमधली भागीदारी आणखी बळकट होईल, असं त्यांनी म्हटलं आहे. भारत आणि संयुक्त अरब अमिरात यांच्यात अनेक शतकांपासून व्यापार होत असून, २०२२-२३ या वर्षात भारतात थेट परकीय गुंतवणूक करणारा संयुक्त अरब अमिरात हा चौथा देश असल्याचं आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं म्हटलं आहे. भारतात पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात एकंदर ७५ अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्यासाठी वचनबद्ध असल्याची ग्वाही आमिरातीनं दिली आहे.

**<><><><><>**

गव्हाच्या साठ्याच्या मर्यादेत बदल करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. हे बदल ३१ मार्च २०२५ पर्यंत लागू असतील. मोठे व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी गव्हाच्या साठ्याची मर्यादा आता दोन हजार टनांवरून एक हजार टनांपर्यंत कमी करण्यात आली आहे. किरकोळ विक्रेत्यांसाठी  प्रति विक्री कक्षासाठीची मर्यादा  दहा टनांवरून पाच टनांपर्यंत आणण्यात आली आहे. अन्नसुरक्षेचं नियोजन करण्यासाठी आणि काळाबाजार रोखण्यासाठी केंद्र सरकारनं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधले व्यापारी, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते आणि इतरांसाठी गव्हाच्या साठ्यावर मर्यादा घातली होती. आता त्यात बदल करण्यात आले आहेत. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली आहे. देशात गहू मुबलक प्रमाणावर उपलब्ध असल्याचंही त्यात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

भारताची २०३५ पर्यंत **भारत अंतरिक्ष स्टेशन** हे स्वतःचं अंतराळस्थानक उभारण्याची योजना आहे,  असं विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी काल सांगितलं. भारताची २०४० पर्यंत चंद्रावर उतरण्याचीही योजना असल्याची माहिती त्यांनी दिली. दिल्लीत विज्ञान क्षेत्राशी संबंधित मंत्रालयांच्या आजवरच्या कामगिरीविषयी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. केंद्र सरकारनं अंतराळ क्षेत्रात केलेल्या सुधारणांची माहिती त्यांनी दिली. आत्तापर्यंत ४३२ परदेशी उपग्रह भारतातून प्रक्षेपित केले असल्याचं ते म्हणाले आणि त्यातले नव्वद टक्के उपग्रह गेल्या दहा वर्षांमध्ये प्रक्षेपित झाल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. जैवतंत्रज्ञान, जैव-अर्थव्यवस्था, संरक्षण आणि कृषी या क्षेत्रांमध्ये विज्ञानाच्या माध्यमातून भारतानं मोठी भरारी घेतल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

पोर्तुगालचे परराष्ट्र व्यवहार मंत्री पाउलो रांगेल आज त्यांच्या चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर नवी दिल्लीत आले आहेत. त्यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. उद्या नवी दिल्लीत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासोबत पाउलो रांगेल यांची बैठक होणार आहे. या भेटीमुळे दोन्ही देशांचे बहुआयामी संबंध अधिक दृढ होतील, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेत आज गाझा पट्टीत सुरु असलेल्या इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी करण्या संदर्भातला ठराव मंजूर झाला. यावेळी सर्व युद्धबंद्यांना तात्काळ सोडण्याचीही मागणी करण्यात आली. १९३ सदस्यांच्या राष्ट्रसंघातल्या १५८ सदस्यांनी युद्धबंदी करण्याच्या ठरावाच्या बाजूनं मतदान केलं.

**<><><><><>**

श्रीलंकेतला प्रमुख विरोधी पक्ष **समागी जन बालवेगया** यांनी श्रीलंकेचे स्पीकर अशोक रणवाला यांच्या विरोधात अविश्वास ठराव आणण्याचे संकेत दिले आहेत. पक्षाचे खासदार अजित पी. परेरा यांनी एका स्थानिक वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत याचे सूतोवाच केलं. श्रीलंकेचे स्पीकर अशोक रणवाला यांच्या बनावट पदवी प्रमाणपत्रावरून हा वाद सुरु झाला होता.

**<><><><><>**

अफगाणिस्तानचे निर्वासितांसाठीचे मंत्री खालिल रेहमान हक्कानी यांचा काल आत्मघातकी हल्ल्यात मृत्यू झाला. काबूलमधील त्यांच्या कार्यालयात हा स्फोट झाला. हक्कानी कागदपत्रांवर सही करत असताना आत्मघातकी हल्लेखोरानं प्रवेश केला आणि त्यानं बॉंब उडवून दिला. या हल्ल्यात आणखी सहा

जणांचाही मृत्यू झाला. हा हल्ला आयसिसच्या अतिरेक्यांनी घडवून आणल्याचा आरोप अफगाणिस्ताननं केला आहे. मात्र, अजून कोणत्याही संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. अफगाणिस्तानमध्ये तालिबाननं सत्तेवर ताबा मिळवल्यानंतरचा हा सर्वांत मोठा हल्ला आहे. हक्कानी यांचे पुतणे सिराजुद्दिन हक्कानी हे तालिबान सरकारमध्ये गृहमंत्री आहेत. खलिल हक्कानी हे अमेरिकेनं दहशतवादी संघटनेच्या यादीत समाविष्ट केलेल्या हक्कानी नेटवर्क या संघटनेचे महत्त्वाचे सदस्य होते.

<><><><><>

चीनच्या हांगझोऊ इथं सुरू असलेल्या बॅडमिंटन वर्ल्ड टूर फायनलमध्ये ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय महिला दुहेरी जोडीनं मलेशियाच्या परली टॅन आणि थिनाह मुरलीधरन या जोडीचा  पराभव करून तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. भारतीय जोडीनं आज दुसऱ्या गटातील सामन्यात मलेशियाचा २१-१९, २१-१९ असा सरळ गेममध्ये पराभव केला. या स्पर्धेत भारताचं प्रतिनिधित्त्व करणारी ट्रीसा आणि गायत्री यांची जोडी ही  एकमेव जोडी आहे.

<><><><><>

फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत  आज दुपारी भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश आणि चीनचा गेल्या वेळचा विजेता डिंग लिरेन यांच्यात चौदावा आणि अंतिम सामना होणार आहे.